PC-3 Data- D/Circular (vikas)

# मुंबई विद्यापीठ

**No. Aff./ICC/ (2023-24)/02/ of 2023**

## परिपत्रक:

**विषय: डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सर्व अकृषी विद्यापीठे/महाविद्यालयांनी कार्यक्रम आराखडा तयार करून कार्यक्रमाचे आयोजन करण्याबाबत.**

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांना कळविण्यात येते की, भारतरत्न डॉ. बाबसाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात. भारतीय लोकशाही व्यवस्थेची पायाभरणीबरोबर त्यांनी सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक दृष्टया मौलिक असे योगदान भारतीय समाजाला दिले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीयांचे प्रेरणास्थान आहे. त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि आधुनिक भारत घडवण्यासाठी त्यांनी केलेल्या संघर्षाची समाजाला व विशेषत: शिक्षण क्षेत्रातील विद्यार्थी आणि शिक्षकांना प्रेरणा मिळावी यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे जसे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याशी संबंधित विषायावर परिसंवाद, त्यांच्या विचारधारांवर आधारित ग्रंथोत्सव, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा आदी नावीन्यपूर्ण/ कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

महाविद्यालयांनी आयोजीत केलेल्या उपक्रमांना स्थानिक वर्तमानपत्रात पुरेशा प्रमाणात प्रसिध्दी देण्यात यावी तसेच वरील प्रमाणे उपक्रम व कार्यक्रमांचे आयोजन करून अनुपालन अहवाल विभागीय सहसंचालक कार्यालयामार्फत संचालनालयास सादर करण्यात यावा.

मुंबई—४०० ०३२
१३ एप्रिल, २०२३

प्रभारी कुलसचिवांकरिता

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक.